सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २६१ वा ■ शनिवार १४ जून २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १५ जून २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 261 ■ Saturday 14 June 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027



## बच्चू कडू यांचे उपोषण स्थगित सरकारला २ ऑक्टोबरपर्यंत डेडलाईन

अमरावती (सरकार): प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांचे उपोषण अखेर सातव्या दिवशी सुटले. गेल्या सहा दिवसांपासून त्यांचे अन्नत्याग आंदोलन सुरु होते. त्यांच्या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत होता. कालपासून सरकार त्यांनी आंदोलन मागे घ्यावे म्हणून प्रयत्न करत होते. आज मंत्री उदय सामंत हे आश्वासनाचा खलिता घेऊन मोझरीत दाखल झाले. त्यांनी सरकारची बाजू मांडली. त्यानंतर बच्चू कडू यांनी उपोषण सुटल्याचे जाहीर केले. मागण्या मान्य करून त्यावर योग्य ती अंमलबजावणी केली नाही तर आम्ही मंत्रालयात घुसू. तिथे आंदोलन करू असा इशारा बच्चू कडू यांनी दिला. त्यांनी सरकारला डेडलाईन दिली आहे. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती आहे. त्यादिवशी भगतसिंह यांच्यासारखे आंदोलन करू असा सज्जड दमच कडू यांनी भरला.

## अजित पवारांच्या लाईव्ह कार्यक्रमात

# प्रहारचा राडा

## सरकारविरोधात घोषणाबाजी, पोलिसांनी घेतलं ताब्यात

पुणे (सरकार): माजी मंत्री बच्चू कडूंचं विविध मागण्यासाठी मागील सात दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. यामुळे बच्चू कडू यांची प्रकृती दिवसेंदिवस खालवत चालली आहे. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता आहे. बच्चू कडू यांना रुग्णालयात दाखल न केल्यास त्यांच्या जीवाला धोका आहे, असं अमरावतीचे तिवसा येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवराज माने यांनी तहसीलदारांना पत्र लिहिले आहे. दरम्यान त्यांच्या या आंदोलनांचे पडसाद आज पुण्यात देखील पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कार्यक्रमावेळी प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली, यावेळी मोठा गोंधळ झाला, बच्चू कडूंच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अजित पवारांच्या कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी



घोषणाबाजी केली.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागण्यासाठी अजित पवारांचे भाषण सुरू होताच कार्यकर्त्यांनी जाब विचारला, यावेळी महिला आक्रमक झाल्याचे दिसून आले. पुण्यातील उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमात अचानक गोंधळ उडाला. बच्चू कडू यांच्या उपोषणावरून आंदोलनकर्ते आक्रमक झालेले दिसले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज पुणे दौऱ्यावरती आहे. दौऱ्यावेळी असणाऱ्या एका कार्यक्रमात माजी मंत्री बच्चू कडूंच्या काही कार्यकर्त्यांनी अजित पवारांचा कार्यक्रम बंद पाडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अजित पवारांसमोरच गोंधळ घालायला सुरूवात केली. हे सगळे कार्यकर्ते प्रहार संघटनेचे असल्याची माहिती समोर आली आहे. प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू गेल्या काही दिवसांपासून आंदोलन करत आहेत. त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात, यासाठी प्रहारच्या कार्यकर्त्यांनी अजित पवारांच्या कार्यक्रमात घोषणाबाकी करत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला, या प्रकारानंतर कार्यक्रमस्थळी असलेल्या पोलिसांनी घोषणाबाजी करणाऱ्यांना ताब्यात घेतलं आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी 'बच्चू कडूंना न्याय द्या' अशा शब्दांत जोरदार घोषणाबाजी सुरू केली आहे.

## सुनेचा पैशासाठी शारीरिक व मानसिक छळ ;गुन्हा दाखल

परळी (सरकार) संपूर्ण राज्यात गाजत असलेल्या हगवणे प्रकरणाची पुनरावृत्तीच वाटावी अशा प्रकारची घटना परळीतही समोर आली आहे. परळीतील एका प्रतिष्ठित कुटुंबातील सुनेला पैशासाठी शारीरिक व मानसिक छळाला सामोरे जावे लागले आहे. याप्रकरणी आता पीडित सुनेने पती व सासरच्या नातेवाईकां विरुद्ध परळी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असुन त्याप्रमाणे गुन्हाही दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, परळीतील जयनगरमधील रहिवाशी पिडित विवाहितेने परळी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याप्रमाणे तिचा लग्नापासून २००८ ते २०२२ दरम्यान माहेरहून पैसे घेवुन ये या कारणांवरुन वेळोवेळी शारिरीक मानसिक छळ केला गेला.तसेच अनैसर्गिक शारीरिक संबंध वगैरे सततचा त्रास दिला.याबाबत विरोध केला असता पतीने गळा दाबून जीवे मारुन टाकण्याचा प्रयत्न केला.सासऱ्याकडे याबाबत सांगायला गेलं तर सासऱ्याने त्रास देत गळा दाबून मारण्याचा प्रयत्न केला. सासरच्या मंडळींकडून मोठमोठ्या रकमेची मागणी व अर्थिक कारणास्तव सातत्याने शारीरिक व मानसिक छळ केला गेला. या फिर्यादीवरून आरोपी तिचा नवरा राजेंद्रकुमार रामचंद्र ईप्पर, सासरा रामचंद्र ईप्पर रा. चैतन्यनगर नांदेड यांच्यासह सासु, दीर, नणंद अशा पाच जणांविरुद्ध गुरनं. १२५/२०२५ कलम ३०७, ३७७, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि गट्टूवार हे करीत आहेत.

## परळी नगर परिषदेकडून माहिती अधिकाराची पायमल्ली

परळी (सरकार) परळी नगर परिषदेकडून कोणता कर्मचारी कोणत्या पदावर कार्यरत आहे, याची माहिती देण्यास प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असून, माहिती अधिकार कायद्याचा सरळसरळ अपमान केला जात असल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे. नागरिकांनी माहिती अधिकार अंतर्गत मागवलेली माहिती नगर परिषद प्रशासन 'केराची टोपली' दाखवत फेटाळून लावत असल्यामुळे पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, नगर परिषदेतील काही कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पद्धतीने पदांवर ठेवण्यात आल्याचा संशय असून, नेमकी हीच माहिती अधिकारात

**कर्मचाऱ्यांच्या पदांची माहिती देण्यास सातत्याने टाळाटाळ!**

विचारल्यावर प्रशासन बगल देत आहे. हे फक्त माहिती न देण्याचे प्रकरण नसून, संभाव्य अपारदर्शकतेचे आणि अधिकारांचा गैरवापर केल्याचे द्योतक आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि ठढख कार्यकर्त्यांनी या प्रकरणात संताप व्यक्त केला आहे. जर कोणता कर्मचारी कोणत्या पदावर आहे, एवढी साधी माहिती सुद्धा प्रशासन लपवत असेल, तर अंतर्गत काहीतरी काळंबेरं दडलेलं आहे हे स्पष्ट होतं, असे मत माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी व्यक्त केले. माहिती अधिकार कायद्यानुसार कोणतीही माहिती ३० दिवसांच्या आत द्यावी लागते. परंतु नगर परिषदेकडून वेळकाढूपणा केला जात आहे. काही प्रकरणांमध्ये पूर्णपणे माहिती नाकारण्यात आली असून, यामुळे कायद्याच्या कलम ७(१) आणि १८ चं स्पष्ट उल्लंघन होत आहे. दरम्यान, नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी उत्तर देण्यास टाळाटाळ केली, हे आणखीच संशय वाढवणारे ठरते. आता या प्रकरणाची तक्रार थेट राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्याची तयारी नागरिकांकडून सुरू आहे. नगर परिषद कर्मचाऱ्यांची नेमणूक पारदर्शक रितीने झाली आहे का? माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का होत नाही? नागरिकांना माहिती नाकारण्यामागे नेमकी कोणती भीती आहे?



बीड ज्येष्ठ महिन्यातील संकष्टी चतुर्थी निमित्त शनिवारी बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नामलगाव येथे श्री आशापुरक गणेशाचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासून भाविकांच्या मंदिरात रांगा लागल्या होत्या सकाळी श्री गणेशाची विधिवत पूजा अर्चना संपन्न झाली. (छाया कृष्णा शिंदे)

## नीट यूजी २०२५ रिझल्ट जाहीर

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): नीट यूजी २०२५ रिझल्ट जाहीर झाला आहे. पशशीं.पीर.पळल.ळप या धिकृत वेबसाईटवर जाऊन, या परीक्षेस बसलेले विद्यार्थी त्यांचा निकाल चेक करू शकतात. नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीए (NTA) ने पास झालेल्या विद्यार्थ्यांचे गुण आणि नीट यूजी टॉपर्सची यादी देखील जाहीर केली आहे.

NEET UG 2025 Result: असा चेक करा नीट यूजी २०२५ रिझल्ट सर्वात पहिले NEET च्या ऑफिशिअल वेबसाईटवर neet.nta.nic.in - यावर जावे.

त्यानंतर होमपेजवर "NEET UG 2025 रिझल्ट' या लिंकवर क्लिक करावे. त्यानंतर तुमचे लॉगिन क्रेडेंशिअल, उदा. डमिशन कार्ड नंबर, जन्मतारीख आणि कॅप्चा कोड टाकून सबमिट करावे. ही प्रोसेस झाल्यानंतर तुम्हाला स्क्रीनवर तुमचा नीट यूजी २०२५ रिझल्ट दिसेल. त्यानंतर तुम्ही तुमचं स्कोअकार्ड डाऊनलोड करू शकता. २०२४ साली रूपायन मंडल ने केलं होतं टॉप गेल्या वर्षी, अनेक विद्यार्थ्यांनी छएएढ णत्र परीक्षेत अव्वल स्थान पटकावले होते. त्यापैकी एक होता रूपायन मंडल, जो पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील रहिवासी होता. त्याने ७२० पैकी ७२० गुण मिळवले. त्यानंतर रुपायनने एका मुलाखतीत सांगितले होते की, तो नववीत असतानाच त्याने नीट परीक्षेची तयारी सुरू केली होती आणि त्यासाठी त्याने ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही प्रकारचे कोचिंग घेतले होते.

## महिलेला अमानुष मारहाण व विनयभंग

### चार जणांविरोधात गंभीर गुन्हे दाखल

अंबाजोगाई (सरकार) घाटनांदुर (ता. अंबाजोगाई) येथील एका २७ वर्षीय महिलेला काटेरी फांद्यांबाबत विचारणा केल्याच्या कारणावरून मारहाण, विनयभंग आणि जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संबंधित पीडित महिलेच्या तक्रारीवरून चार जणांविरोधात अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा तपशील असा आहे की, दिनांक ०९ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता पीडित महिला आपल्या मुलासह गावातील शेत गट क्र. ६५ मध्ये गेली असता तिने पाहिले की तिच्या शेतात कोणीतरी काटेरी झाडांच्या फांद्या टाकल्या होत्या. या प्रकरणी विचारणा करण्यासाठी तिने आपल्या आजा सासऱ्याला – बापूराव हरीभाऊ सोनपिर यांना प्रश्न विचारला, परंतु त्याच दरम्यान गणपत बापूराव सोनपिर आणि त्याची पत्नी मिनाक्षी



तिथे आले. गणपतने पीडितेवर शिवीगाळ करत तू इथे कशाला आलीस? अशी धमकी दिली आणि त्यानंतर वाईट हेतूने विनयभंग केला. पीडितेचे हात मिनाक्षीने पकडले, तर बापूराव आणि मिनाक्षीचा भाऊ (नाव माहित नाही) यांनीही तिला धरून ठेवले. त्याचवेळी गणपतने चिंचेच्या काठीने पीडितेच्या पाठीवर, कंबरेवर, हातापायांवर, छातीवर आणि मानेला बेदम मारहाण केली. शेवटी, तुला जिवंत ठेवत नाही असे म्हणून कोयत्याने डोक्यात घाव घालून तीव्र दुखापत केली. पीडिता बेशुद्ध पडली. काही वेळाने शुद्ध आल्या नंतर गावातील चंद्रकांत वैजनाथ सोनपिर व त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीने तिला घाटनांदूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले आणि त्यानंतर ड्ढढ शासकीय दवाखाना अंबाजोगाई येथे हलवले.

पीडितेच्या जबाबावरून गणपत बापूराव सोनपिर, मिनाक्षी गणपत सोनपिर, बापूराव हरीभाऊ सोनपिर, व मिनाक्षीचा भाऊ (नाव अज्ञात) या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक राजकुमार नारायण ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## नविन ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी सात लाख आण विवाहितेने विष घेवून संपवले जीवन

गेवराई (सरकार): नविन ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेरच्या कडून सात लाख रुपये घेऊन ये असे म्हणून शारीरिक व मानसिक छळास कंटाळून गेवराईच्या चकलांबा पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील एक विवाहीतेने विष घेवून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नुकतीच घडली.गयाबाई लालचंद शेळके रा.आनंदवाडी ता.शिरुर कासार जि.बीड असे आत्महत्या केलेल्या विवाहित महिलेचे नाव आहे.

गयाबाई शेळके यांचा विवाह पंधरा वर्षापूर्वी झाला होता.लग्नानंतर प्रारंभीचे सग महिने तिला चांगली वागणूक देण्यात आली.मात्र, त्यानंतर गयाबाई हिला ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी तुझ्या बापाकडुन सात लाख रुपये आणण्यासाठी तिचा पती लालचंद शेळके,सासरा आश्रुबा शेळके,सासू संगीता शेळके,नंणद अलका भातखणे आणि मामस सासरा संदीप मोरे हे गयाबाई हिला शारीरिक व मानसिक छळ करत मारहाण करत असत.

एवढेच नाहीतर गयाबाईला माहेरी आणून सोडत होते.दरम्यान गयाबाई हिचे वडिल रावसाहेब पवार यांची परिस्थिती हलाखीची असल्याने ते मुलीच्या सासरची मागणी पूर्ण करु शकले नाही.माहेरी असलेल्या गयाबाई शेळके या विवाहीत महिला मागील सहा वर्षांपासून माहेरी होती.मागच्या आठवड्यात तिला सासरी सोडण्यात आले होते.

सासरी जाताच तिचा पुन्हा मानसिक छळ सुरु झाल्याने गयाबाई हिने अखेर सासरच्या छळास कंटाळून (ता ११)शेतात विष प्राशन केले.याची माहीती कुटुंबीयाना मिळताच तिला तात्काळ बीडच्या शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.परंतू उपचार सुरु असताना तिचा मृत्यू झाला.याप्रकरणी रावसाहेब पवार यांच्या तक्रारीवरून चकलांबा पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पाच ही आरोपी पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत.

गेवराईतील एरंडगाव येथील वर्षा लाखे या महिलेने सासरच्या छळास कंटाळून विहीरीत उडी मारून आत्महत्या केल्याची ताजी घटना असतानाच चकलांबा पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील गयाबाई शेळके या महिलेने सासरच्या छळास कंटाळून विष घेवून जीवन यात्रा संपविली. चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील गयाबाई लालचंद शेळके या महिलेच्या आत्महत्ये प्रकरणातील पती,ससू-सासरा, नंणद आणि मामे सासरा यांना अटक करण्यात आली असून,या पाच जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे अशी माहीती एपीआय संदीप पाटील यांनी दिली.

## ना.पंकजाताई मुंडे यांचे देशी गोवंश संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

### २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन म्हणून साजरा होणार

मुंबई (सरकार): राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, दरवर्षी २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा अध्यादेश सरकारने निर्गमित केला आहे.



यापूर्वीच देशी गायीस राज्यमाता-गोमाता म्हणून घोषित करण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात. मात्र, कमी उत्पादनक्षमता व प्रजननक्षमतेमुळे या गायींच्या संख्येत सातत्याने घट होत चालली आहे. यामुळे त्यांचे जतन व संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर, देशी गायींचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करून अधिक उत्पादनक्षम देशी गायी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने घेतले आहे. यासोबतच देशी गायींच्या दुधाचे, शेणाचे, गोमुत्राचे उत्पादन व विपणन यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन साजरा करताना चर्चासत्रे, शिबिरे, प्रदर्शने व विविध स्पर्धा यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. राज्य शासनाच्या आयुक्त, पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या संयुक्त विद्यमाने या दिवसाचे आयोजन करण्यात येणार असून, यासाठी लागणारा खर्च गोसेवा आयोगाच्या निधीतून करण्यात येणार आहे.

राज्यातील देशी गोवंशाच्या जतनासाठी व लोकजागृतीसाठी शासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह ठरत असून, स्थानिक देशी गायांच्या संवर्धनासाठी एक सकारात्मक पाऊल असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## संपादकीय

# ट्रम्प-मस्क दिलजमाई; दोघांच्या गरजेची...


अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि बिलेनियर उद्योगपती एलॉन मस्क यांच्यात मतभेद झाले आणि ते पेल्यातील वादळ ठरले. दोघांनीही काल समझोता केला आणि एक बिलेनियर उद्योगपती आणि अमेरिकन अध्यक्ष यांच्यातील समझोता अखेर अस्तित्वात आला. आता त्यांच्यात समझोता झाला आहे तेव्हा त्यांच्या संबंधांकडे पाहिले असता असे लक्षात येईल की, ट्रम्प यांना अमेरिकन अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसवण्यासाठी मस्कच जबाबदार होते आणि त्यांच्या पाठिंब्यामुळेच ट्रम्प अध्यक्षपदाच्या आसनावर विराजमान झाले. दुसऱ्या टर्मसाठी ट्रम्प जेव्हा तयारी करत होते तेव्हा बिलेनियर उद्योगपतींनी त्यांच्या विजयात महत्त्वाची भूमिका साकारली यात काही शंका नाही. जसे की, अध्यक्ष हॅरी ट्रुमन यांच्या निवडीत तेव्हाचे उद्योगपती ज्यांचे नाव अद्यापही गुलदस्त्यात आहे त्यांच्यामुळे ट्रुमन अध्यक्ष होऊ शकले. त्यानंतर आता ट्रम्प आणि मस्क यांच्यात असेच नाते आहे. अर्थात ट्रम्प आणि ट्रुमन यांच्यातील फरक लक्षणीय आहे. ट्रुमन इतके कधीही तिरस्करणीय नव्हते जितके ते ट्रम्प आहेत. पण ते असो. २०२४ मध्ये ट्रम्प आणि मस्क यांच्यातील नातेसंबंध यांचे अधोरेखित झाले होते जेव्हा मस्क यांनी ट्रम्प यांच्या मोहिमेत न भूतो न भविष्यती अशी भूमिका बजावली. तेव्हापासून ट्रम्प आणि मस्क यांच्यातील जवळीक वाढली आणि व्हाईट हाऊस यांच्यात तिचा बोलबाला झाला, पण या त्यांच्या संबंधात गेल्या आठवड्यापासून तणाव सुरू झाला आणि दोघांत संघर्षाचे खटके उडू लागले. जनतेतून टीका तर होतच होती, पण त्यानंतर दोघांत तीव्र खटका उडाला. गेल्या आठवड्यात ट्रम्प आणि मस्क यांच्यात भागीदारी होती, ती तणावपूर्ण होती आणि त्यामुळे ट्रम्प आणि मस्क यांच्यातील तणावाचे रूपांतर गेल्या आठवड्यात बाचाबाचीत झालेले पाहिले. ७८ वर्षीय ट्रम्प हे माझ्याशिवाय निवडणूक जिंकू शकले नसते अशी मल्लिनाथी मस्क यांनी केली, तर ट्रम्प हे पूर्ण कृतघ्न आहेत असा आरोप त्यानी जाहीररीत्या केला. एक जगप्रसिद्ध उद्योगपती आणि दुसरा अमेरिकेचा ताकदवान सर्वात मोठा शक्तीशाली अमेरिकन अध्यक्ष यांच्यातील या संघर्षाचे परिणती काय होणार यावर जग अंदाज लावत बसले. आता जग थोडे-फार सावरले असले तरीही या संघर्षाचा परिणाम चांगला होणार नाही हे दोघांनाही माहीत आहे. ट्रम्प यांनी मस्क यांच्यात अवाढव्य उद्योगजगताला धक्का लावण्याची धमकी दिली आहे आणि मस्क यांच्या काळजाचा ठोकाच त्यामुळे चुकला, त्याने कदाचित मस्क यांना आपली धमकी मागे घेऊन ट्रम्प यांच्याशी जुळवून घ्यावे लागले असावे. या भांडणाची अपरिहार्य परिणती म्हणजे ट्रम्प यांनी आपल्याकडील सरकारी वरदहस्त मस्क यांच्या कंपन्यांना काढून घेतला आणि परिणामी मस्क यांच्या टेस्लाच्या किमती १४ टक्क्यांनी गुरुवारीच कोसळल्या. अर्थात ही एकतर्फी घोषणा नव्हती, तर मस्क यांनीही मग ट्रम्प यांच्याविरोधात महाभियोग चालवण्याची धमकी दिली. या युद्धात मस्क हे युद्ध जिंकू शकणार नाहीत कदाचित पण ते ट्रम्प यांना धडा शिकवू शकतात आणि आपली किंमत वसूल करू शकतात. ट्रम्प यांना याची जाणीव असावी, पण त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की, मस्क यांनी आधीच आपले मंत्रिमंडळ सोडून जायला हवे होते, पण आता दोघांनाही आपापली चूक कळून आली आहे आणि त्यामुळे दोघांनीही आपल्या समशेरी म्यान केल्या आहेत. यात विजय कुणाचा झाला अथवा कुणाचा पराभव झाला हे ज्याच्या त्याच्या भूमिकेप्रमाणे ठरेल. ट्रम्प आणि मस्क यांनी शक्तीशाली पण अनौपचारिक, पण अशक्य वाटणारी आघाडी उघडली होती, आता ती पुन्हा मजबूत झाली आहे असे वाटते, पण हे किती दिवस चालेल याचा काहीच अंदाज नाही, कारण दोघेही अहंमन्य आणि अहंकारी नेते आहेत. त्यात दोघांचेही इगो आपसात टकराव देत असतात. त्यामुळे किती दिवस हे तात्पुरते पॅचअप चालेल हे काही सांगता येत नाही. आता हा प्रश्न आहे की, हा संघर्ष कुठे जाणार आहे. काँग्रेसच्या रिपब्लिकन खासदारांना ट्रम्प यांच्या पाठीशी सदस्य ठेवणे अवघड जाणार आहे. ट्रम्प यांनी अगोदरच मस्क यांच्या सरकारी कंत्राटांना धक्का देणे सुरू ठेवले आहे, तर मस्क यांनी आपल्याशी शत्रुत्व करतील त्यांना कव्हर देणे बंद केले आहे. त्याचा फटका ट्रम्प यांच्या सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना बसेल. दरम्यान डेमोक्रेट्स बाजूला पडले आहेत. काहीजण मस्क यांचे स्वागत करण्यास तयार आहेत कारण मस्क यांनी त्यांच्या पक्षाला मदत केली आहे आणि त्यांना पुन्हा ते आपल्या पक्षात वळवून घेण्यास तयार आहेत, पण एकूण डेमोक्रेट्स मात्र विभागलेले आणि द्विधा मनस्थितीत आहेत. काही राजकीय तज्ज्ञांच्या मते हा झिरो सम गेम आहे. म्हणजे कोणत्याही क्षणी ट्रम्प यानी असे काही पाऊल उचलले ते रिपब्लिकन पक्षाला दुखावेल. सध्या मात्र डेमोक्रेट्स लांबून या दोन दिग्गजांमधील लढाई पाहतील आणि कुणालाही साथ देणार नाहीत अशी स्थिती आहे. अर्थात या युद्धाचा एक वाईट परिणाम समोर आला आहे तो म्हणजे नासाच्या स्पेस लीडरशिपच्या बाबतीत, नासाची अंतराळ मोहीम धोक्यात आली आहे आणि मस्क यांनी आता आपला मोहिमेला असलेला आर्थिक पाठिंबा काढून घेण्याची शक्यता असल्याने ही मोहीमच संकटात सापडली आहे. त्यामुळे अमेरिकेची अंतराळ विज्ञानातील झेपही. शाब्दिक युद्धाने सुरुवात झालेली असली तरीही आता तिची परिणती युद्धबिंदूत झाली आहे आणि अमेरिकन अंतराळ विज्ञान आणि एक्सप्लोरेशन यांना त्याचा जबरदस्त फटका बसला आहे. या आगीत ट्रम्प यांनी तेल ओतले आहे आणि मस्क यांच्या स्पेस एक्स या कंपनीशी असलेले अंतराळ करार मोडीत काढण्याची शक्यता आहे त्यामुळे ट्रम्प यांना जसा फटका बसला आहे तसाच तो मस्क यांनाही बसला आहेच. आता पुढे काय होणार ते दोघेही सांगू शकत

# आजोळच्या संस्कृतीची शिदोरी

नुकत्याच मे महिन्याच्या सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. मे महिना म्हटलं की डोळ्यांसमोर येतं ते आजोळ म्हणजेच मामाचं गावं. प्रत्येक मुलांच्या जिव्हाळ्याचा विषय. पूर्वी एखाद्या मौंजीबंधन, लग्नप्रसंग व मे महिना असे वर्षातून एकदाच आजोळी जायला मिळत असे. झुक झुक आगीनगाडी धुरांच्या रेघा हवेत काढी... असे गाणे म्हणत त्या दिवसाची वाट बघण्यात पूर्ण वर्ष निघून जायचं. आजही आजोळ आठवलं की डोळ्यांसमोर येते ती आजोळची अल्हाददायी पहाट. पहाटे पहाटे जाग यायची तीच मुळी आजी म्हणायची त्या ओव्यांनी. एकत्र कुटुंबपद्धती असल्याने घरामध्ये पंचवीस-तीस जणांचा राबता असायचा. आजी नेहमी चार वाजता उठायची. उठल्यावर अंगणात सडा सारवण करून त्यावर सुंदर रांगोळी काढली जायची. अंघोळ वैगेरे आटोपून अंगणातील तुळशी वृंदावनातील तुळशीची पूजा करून ती जात्यावर बसत असे, तिच्यासोबत मामी पण बसत असे आणि दोघी मिळून ओव्या म्हणत असत. पहाटे आजीच्या ओव्यांनी जाग येणं म्हणजे पूर्ण दिवस मन प्रसन्न राहणं.

**पहिली माझी ओवी गं,**
**हात खुंट्याला लाविला**
**देव तो विठ्ठल पहिला**
**ओवीला गाईला !!**
**दुसरी माझी ओवी गं**
**जात्याच्या पाळीला**
**ओवीला गं लेक बाई**
**माझ्या वनमाळीला!!**

या ओव्या ऐकता ऐकता आम्हाला जाग यायची. त्या ओव्यांमधून देवांची चरित्रे, ऐतिहासिक गोष्टी यांचे देखील वर्णन व्हायचे. अंघोळी वगैरे आटोपून देवघरात सर्व आरतीला जमायचे. तोवर आजोबांची पूजा झालेली असायची. आरती झाल्यावर सर्वजण एकत्र बसून न्याहारी करायचो. नंतर मामा आम्हाला गाव फिरवायला नेत असे. गड किल्ले करायला, विहीरीत पोहायला शिकवत असे. आता मात्र गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी असे म्हणण्याची वेळ आली आहे. आता विभक्त कुटुंब पद्धती आल्याने आजोळ पण विभक्त झाले आहे. मातीचे अंगण जाऊन तिथे काँक्रीटचे अंगण झाले. पहाट आता सकाळी सहा वाजता होते. जात्याचा उपयोग फक्त लग्नप्रसंगी होतो. आता पहाटेच्या ओव्यांऐवजी भांड्यांच्या आवाजाने जाग येते. सुट्ट्यांमधले मामाचे गाव हरवत चालले आहे. त्यातील मायेचा ओलावा संपत चालला आहे. आता आम्ही सुट्ट्या लागण्याआधी टूर्स पॅकेज बुक करतो. यावर्षी आम्ही बाहेर फिरायला जाणार आहोत. आम्ही पुढच्या वर्षी येतो असे कारणं सांगतो. वाट पाहत असलेल्या वृद्ध डोळ्यांतले पाणी जर आम्हाला दिसत नाही तर त्या कंपित आवाजातल्या ओव्या आमच्या मुलांना कशा साद घालणार? कशी आमच्या मुलांना नाती काय असतात, गावाकडची संस्कृती काय असते, एकत्र कुटुंबपद्धती काय असते हे कळणार. फक्त पुस्तकात वाचून हे ज्ञान उपयोगाचे नाही, तर त्याला मायेचा स्पर्श सुद्धा असायला हवा. तरच ते हृदयाच्या कुपीत जतन करता येईल आणि त्याचा सुगंध पिढी दर पिढी वाढत राहील. काळानुसार जीवनशैली बदलली आहे हे अगदीच मान्य आहे पण जेव्हा सुट्ट्या असतात तेव्हा सर्वांनी नियोजन करून एकत्र जमून नात्यांमधील मायेचा ओलावा टिकवून ठेवणे गरजेचे आहे. नाहीतर पुढील पिढीला फक्त आई, बाबा आणि मुलगा/ मुलगी हीच नाती फक्त माहीत होतील. तसेच नुसते एकत्र जमून मोबाइलमध्ये रमणे हा देखील त्याच्यावरचा उपाय नाही. तर सर्वांनी जेवण, चहा, न्याहारी एकत्र करत असताना प्रत्येकाने आपापल्या लहानपणाचे गोड अनुभव सांगितले पाहिजेत. तसेच मोठ्यांचा आदर व लहानांवर प्रेम कसे केले जाते हे आपल्या वागण्यातून दाखवून दिले पाहिजे. मोठ्यांना उलट बोलणे, कसे चुकीचे आहे हे समजावून सांगितले पाहिजे. हीच तर आपली भारतीय संस्कृती आहे. आपल्या संस्कृतीचे पाश्चिमात्य देशांनी अनुकरण करायला घेतले आहे मग आपली ही संस्कृती आपल्या लहानांपर्यंत पोहोचवणे आपली जबाबदारी नाही का? प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की लहान मुले मोठ्यांचे अनुकरण करतात तेव्हा आज तुम्ही जसं त्यांच्या समोर वागाल ते सुद्धा तुमच्यासोबत तसेच वागतील. कित्येक घरांमध्ये सकाळी उठल्यावर मोठ्याने इंग्रजी गाणी लावली जातात आणि ही मंडळी अभिमानाने



सांगतात की आमची मुले इंग्रजी गाणी, इंग्रजी सिरीयलच पाहतात. कसला वृथा अभिमान म्हणावा हा... आणि जेव्हा हीच मुले नोकरीनिमित्त परदेशी जाऊन स्थायिक होतात तेव्हा कुठे जातो हा अभिमान? आज पाश्चिमात्य देशांची सकाळ ओंकार उच्चाराने होते. आपल्याकडे जरी पहाटेच्या ओव्या ऐकू येत नसल्या तरी प्रत्येक घराघरांत किमान कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती। करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम्। हा श्लोक म्हटला गेला पाहिजे. लहान मुलं मातीसारखी असतात त्यांना तुम्ही जसं घडवाल तशी ती घडतील. लहान मुलांची आकलन शक्ती जास्त असते तुम्ही सतत त्यांना श्लोक, स्तोत्र ऐकवत राहिलात किंवा तुम्ही स्वतः म्हणत राहिलात तर ती मुले लवकर आत्मसात करतात. अलीकडे तर संध्याकाळच्या वेळी पाढे, गोष्टी सांगणे हे एखाद दुसरा अपवाद वगळता पूर्णतः बंद झाल्या आहेत.

सात वाजता सिरीयल चालू होतात म्हणून आम्ही देवापुढे दिवा सुद्धा साडे सहालाच लावतो. मग मला सांगा मुलांनी, नातवंडांनी पुढे तीच परंपरा चालू ठेवली, तर यात दोष त्यांना का म्हणून द्यायचा. ते तेच करतात जे त्यांनी लहानपणापासूनच बघितलं आहे. आजोळच्या संस्कृतीच्या शिदोरीची चव ज्यांनी ज्यांनी चाखली त्यांनी पुढच्या पिढीला सुद्धा त्यातील गोडी चाखायला द्यावी... निदान प्रयत्न तरी करायला हवाच!

# रक्ताची अशुध्दी

आपण बऱ्याच ठिकाणी ऐकतो रक्तामध्ये दोष आहे, रक्त जाड आहे, विटामिन्स कमी आहे, रक्त पुरवठा कमी होत आहे, रक्तामध्ये महत्वाचे घटक कमी आहेत. या आणि अश्या अनेक कारणांमुळे अंगाला खाज येणे, डोके जड पडणे, मानसिक आजार होणे, एखादा मोठा आजार होणे, शारिरीक वाढ कमी होणे किंवा योग्य न होणे, हार्मोन्स ची कमी असणे, निरूत्साह होणे, सतत चिंताग्रस्त राहणे, चिडचिड होणे, राग येणे, अशक्तपणा अशी कारणे आपण ऐकतो, कारण जिवंत राहण्यासाठी जसा श्वासोच्छवास गरजेचा आहे तेवढेच महत्वाचे शरिरातील रक्त व रक्तप्रवाह.

तर आज काही विनाखर्चाचे घरगुती उपचार सुचवत आहे जे रोजच्या आहारातील आहेत जर ते योग्य प्रमाणात नियमित घेतल्यास भरपुर रोगांपासुन स्वताच स्वताचे रक्षण करू शकतो.

✻ दररोज किमान ३ खजुर खाणे.✻ महिन्यातुन दोन वेळेस दुपारी सर्व भाज्यांचे सुप घेणे.✻ आठवड्यातुन किमान एकवेळेस जेवणानंतर पान खावे. ✻ दररोज किमान २० ग्रॅम बडीसौफ खाणे.✻ सकाळी अनोश्यापोटी एक चमचा साजुक तुप घ्यावे त्यानंतर १ तासाने कोमट पाणी घ्यावे.✻ टॉमेटो - गाजर - बीट इत्यादी सॅलाड दररोज दुपारी किमान एकवेळेस तरी घ्यावे.✻ शिर्षासन ५ मीनीट व पायांच्या टाचेवर ५ मी. उभे राहावे.✻ महिन्यातुन किमान एकदा १.५ लीटर कोमट पाण्यात मीठ टाकुन ते प्यावे व वमन करावे✻ महिन्यातुन ७ दिवस रात्रीचे जेवण बंद करावे, सलाड व पाणी चालेल.✻ महिन्यातुन २ वेळेस भेंडी व दोडक्याचे ज्युस करून त्यात काळी मिरी ची पावडर व काळे मीठ टाकुन ते कमीतकमी एक कपभर किंवा अर्धाग्लास तरी घ्यावे.✻ पहाटे लवकर उठून १० मीनिट प्राणायाम करावा.✻ ज्यांना वांग आहेत किंवा रक्ताचे इतर काही विकार आहेत, किंवा काही गुप्त त्रास आहेत त्यांनी बृहदहरिद्राखंड चुर्ण ३ महिने घ्यावे. ते कोठेही सहज उपलब्ध आहे. सकाळी व रात्री एक चमचा पाण्यासोबत.✻ स्त्रियांनी मासिक पाळीनंतर व त्याआधीच्या त्रासासाठी दररोज दुपारी जेवणानंतर अर्धाग्लास कोमट पाण्यात काळे मीठ टाकुन नियमित घ्यावे. रक्ताची शुध्दी होतेच शिवाय शरिरातील विषतत्वे हि नाहिशी होतात.✻ दररोज कमीत कमी २० मीनीट चालावे.✻ कडधान्ये, पालेभाज्या, तूप, काळे मीठ, लिंबुचा रस याचे सेवनाने रक्त शुध्द होतेच शिवाय अशक्तपणा हि



जातो. ✻ आठवड्यातुन किमान एकदा दोन्ही पाय कोमट पाण्यात बुडवुन अगदी थोडासा चुना टाकावा व २०/२५ मीनीट बसावे. रक्तातील विषाणु ओढले जातात. असे दररोज केल्यास उत्तमच.

✻ कोणत्याही आहारामध्ये थोडीशी सुंठ वापरावी.

वरील काही मोजके उपाचार सुचवले आहेत, याव्यतिरिक्त अनेक असे घरगुती उपाय आहेत ज्याने असाध्य रोगांवर मात करण्यास आपण आपल्या शरिराला मदत करू शकतो. परंतु ते सर्व लिहिणे शक्य नाही, तेव्हा वरील पैकी कोणतेही जे सहज शक्य असतील ते उपाय करून स्वताला व परिवाराला निरोगी करूया.

निसर्ग उपचार तज्ञ
**डॉ. प्रमोद ढेरे**
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - 92 71 669 669

# साखरे ऐवजी गुळ का खावा?

फुफ्फुसातील संसर्ग रोखतो गुळामुळे रक्त शुद्ध होत. चयापचयाचा वेगही नियंत्रित राहतो. याशिवाय घसा आणि फुफ्फुसाच्या संसर्गावरही गूळ फायदेशीर ठरतो. पोटाच्या तक्रारींवर गुणकारी पोटाच्या विविध तक्रारींवरही गूळ हा रामबाण उपाय आहे. गॅसेस, असिडीटीची तक्रार असेल तर, गूळ खाण्याने त्रास कमी होतो. आंबट ढेकरींपासून सुटका गूळ, सैंधव आणि काळे मीठ एकत्र करून खाल्लं तर आंबट ढेकर येणं थांबते.

**सांधेदुखीतून सुटका** - सांधे दुखत असतील तर गूळ आणि आलं एकत्र करून खाल्ल्यास फायदा होतो. दररोज आलं आणि गुळाचा एक खडा खाल्ल्यास सांधेदुखीला आराम पडतो. थकवा दूर होतो.



गूळ खाण्यानं शरीराला ऊर्जा मिळते. थकवा दूर होतो. थकवा, कमजोरी जाणवत असेल तर जरूर गूळ खावा.

**रक्ताची कमतरता भरून निघते** -गूळ हा लोहाचा मोठा स्रोत आहे. तुमचं हिमोग्लोबिन कमी झाले असेल तर रोज गूळ खाण्यानं तात्काळ फायदा होतो. गूळ खाण्यानं शरीरातील लाल पेशींची संख्या वाढते. त्यामुळे गर्भवती महिलांना डॉक्टर गूळ खाण्याचा सल्ला देतात.

**रक्तदाब नियंत्रणात राहतो** - गुळामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. विशेषतः उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या लोकांना गूळ खाण्याचा सल्ला दिला जातो.

**हाडं मजबूत होतात** - गुळात कॅल्शियम आणि फॉस्फरस यांचं प्रमाण अधिक असतं. हाडांना बळकट करण्यात हे दोन्ही घटक महत्त्वाचे असतात. त्यामुळे गूळ खाण्यानं हाडांसाठीही लाभदायी ठरते.

शरीर कार्यक्षम राहतं गुळामुळे शरीर मजबूत आणि कार्यक्षम राहते. शरीर ताकदवान बनवण्यासाठी दुधात गूळ घालून घेणे उपयुक्त ठरते. दुध आवडत नसल्यास एक कप पाण्यात पाच ग्रॅम गूळ, थोडासा लिंबू रस आणि काळे मीठ घालून प्यायल्यास थकवा दूर होईल.

**सर्दीवरही गुणकारी सर्दी**-पडसं दूर करण्यासाठीही गूळ लाभदायी ठरतो. काळीमिरी आलं आणि गूळ मिसळून खाल्ल्यास सर्दी-पडसं कमी होतं. खोकला येत असेल तर साखरेऐवजी गूळ खाणं लाभकारक ठरतं. आल्याबरोबर गूळ गरम करून खाल्ल्यास घशातील खवखव, जळजळ दूर होते.

**डोळ्यांसाठीही लाभदायी** - गूळ खाल्ल्यानं डोळ्यांची क्षीणता कमी होते. दृष्टी सुधारण्यासही मदत होते.

# शुद्ध वातावरण व पवित्र आचरण

## अध्यात्म : ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज

आपल्या घरातले वातावरण शुद्ध, शांत आणि पवित्र असावे. आपल्याकडे येणाऱ्या माणसाला परत जाऊच नये असे वाटावे. अगदी भगवंताच्या इच्छेने प्रपंच चालला आहे असे समजून, त्या प्रपंचात विद्या, वैभव, घरदार इ. सर्व काही यश संपादन करा; अगदी एखाद्या राजयोग्याप्रमाणे प्रपंचात ऐषआरामात राहून गाद्यागिरद्यांवर लोळा; पण हे करीत असताना तुमचे अंत:करण मात्र भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेले राहू द्या. कोणाशी वाद घालत बसू नका. जगाचा मान फार घातक आहे; त्याची चटक लागली की मनुष्य त्याच्यामागे लागतो, नंतर मान मिळविण्याची कृती थांबते आणि मानही नाहीसा होतो. जगातले अजिंक्य पुरुष सुद्धा कुठेतरी विषयात गुंतलेले असतात, तिथे त्यांचा घात होतो. जगाला ते भारी असतील, पण त्या विषयापुढे त्यांचे काहीच चालत नाही. प्रेमात गुंतू नका, तसे द्वेष, मत्सरातही गुंतू नका; दोन्ही सारखेच घातक आहेत. आपला प्रिय नातेवाईक मेला आणि आपण ज्याच्यावर दावा लावला आहे तो भाऊबंद मेला; दोघेही मेल्याचे सुतक सारखेच! त्याचप्रमाणे, मनुष्य प्रेमाने गुंतला काय आणि द्वेषाने गुंतला काय, नुकसान सारखेच होते. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्याने तो होवो किंवा प्रपंचात दु:ख झाल्यामुळे होवो. ढोंग, बुवाबाजी इ. च्या भानगडीत तुम्ही पडू नका; अगदी काहीही न केलेत तरी चालेल, पण ढोंग मुळीच करू नका; आणि सर्वांनी माझ्यावर कृपा करा, अगदी अनुभवाने मी सांगतो, की बुवा होण्याच्या फंदात तुम्ही पडू नका. आपले कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करून, त्याचे अनुसंधान अखंड टिकू द्या. आमची अशी वृत्ती बनण्यासाठी संतांच्या संगत आपल्याला जरुरी आहे. आपण सर्वजण सत्संगतीमध्ये आहोत असे म्हणतो, मग आमची वृत्ती का न सुधारावी? तर संतांना ज्याची आवड



आहे ते आम्ही धरले नाही, म्हणून आमची वृत्ती सुधारत नाही.

श्रीकृष्णाने उद्धवाला ज्ञान देऊन त्याला गोपींकडे पाठविले. भगवंताच्या नामामध्ये त्या रंगून गेल्या होत्या. गोपींचे नामावरचे प्रेम पाहून उद्धवाला आश्चर्य वाटले. नामामध्ये त्यांना भगवंत दिसत असे; ते पाहून उद्धवाने देवाला सांगितले, देवा, तू मला ज्ञान दिलेस खरे, पण तुझ्या भक्तीचे प्रेम त्याहून श्रेष्ठ आहे, ते तू मला दे. खरोखर, त्या नामाचे माहात्म्य देवाच्या वर्णनापेक्षाही कठीण आहे. तुम्ही सर्वजण इथे आला आहात; इथून रामाजवळून काही मागून न्यायचेच असेल तर त्या नामाचे प्रेम तुम्ही सर्वांनी मागा. सर्वांनी नामस्मरण करा आणि आनंदात राहा. राम कृपा करील, हा भरवसा बाळगा.

**तात्पर्य : आपल्या जीवनात सहजता हवी. सहजतेमध्ये समाधान आहे.**

# विशेष वृत्त

## बॅडमिंटन स्पर्धेत सिध्दी सानपचे दुहेरी यश

**बीड :** शहरातील चंपावती क्रीडा मंडळ येथे जूनमध्ये घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत सिध्दी अतुल वंदना सानप हिने दोन गटात प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले. बुधवारी (दि.११) चंपावती क्रीडा मंडळ येथे आ. विजयसिंह पंडित व मान्यवरांच्या हस्ते सिध्दीला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. १३ व १५ वर्षांखालील मुलींच्या दोन्ही गटात दमदार कामगिरी करत सिध्दी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. बीड येथे विविध वयोगटातील जिल्हास्तरीय बॅडमिटन स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये जिल्ह्यातून १६५ खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. स्पर्धेमध्ये ए. एस. बॅडमिंटन अकॅडमीची बॅडमिटन खेळाडू सिध्दी सानप हिने १३ व १५ वर्षांखालील मुलींच्या वयोगटात प्रथम क्रमांक पटकावला तर १७ वर्षांखालील मुलींच्या वयोगटात उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. कार्यक्रमास सी.एन. धारूरकर, प्रताप माने, सतीश घोडके, आनंद सारडा, शंकराव जगताप, अब्दुल खालेद आदी उपस्थित होते. सिध्दी हिने महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर असलेल्या कळसूबाई शिखर चढाईचा विक्रमही सिध्दीने वयाच्या आठव्या केला आहे. तब्बल पाच हजार चारशे फूट एवढे अंतर असलेले हे शिखर तिने तीन तासात तिने कापले होते.

## जि.प. शाळा वाचविण्यासाठी उपाययोजनेची मागणी

**नांदूरघाट :** केज तालुक्यातील नांदूरघाट जि.प. शाळा वाचवण्यासाठी मागील १८ महिन्यांपासून शाळा समितीचे अध्यक्ष अमोल जाधव लढा देत आहेत यासाठी त्यांनी येत्या १४ जून रोजी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. त्यापूर्वीच प्रशासनाने यावर उपाययोजना करुन काही चुकीची घटना घडण्याच्या आत न्याय द्यावा नसता याला सर्वस्वी जबाबदार प्रशासन असेल असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष शंकर जाधव यांनी म्हटले आहे. निवेदनात म्हटले आहे की, हा लढा आता अमोल जाधव यांचा नसून पूर्ण गावाचा, पूर्ण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा, पालकांचा व सर्वसामान्यांचा झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ याची दखल घ्यावी असे जाधव यांनी म्हटले आहे.

## केज तालुक्यात दोन ठिकाणी वीज कोसळली

**केज:** केज तालुक्यातील कुंबेफळ आणि पवारवाडी येथे वीज कोसळून एका शेतकऱ्याची गाय दगावली आहे तर एकाच्या घराचे नुकसान झाले आहे.दि. १३ जून रोजी सायंकाळी ५:३० वा. च्या सुमारास केज तालुक्यातील कुंबेफळ येथे वीज पडून तेथील शेतकरी शिवाजी गणपती थोरात यांची एक गाय दगावली आहे. तसेच अन्य दुसऱ्या घटनेत सायंकाळी ६:०० वा. च्या सुमारास पवारवाडी ता. केज येथे भागवत विश्वनाथ पवार यांच्या घरावर वीज पडून घराचा काही भाग कोसळून नुकसान झाले आहे. वीज पडली त्यावेळी भागवत पवार यांच्या घरात ते स्वतः, पत्नी, दोन लहान मुले आणि भावजय असे होते. सुदैवाने यात कोणी जखमी झाले नाही मात्र घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या बाबत तहसीलदार राकेश गिड्डे यांनी त्यांच्या अधिनिस्त अधिकाऱ्यांना पंचनाम्याचे आदेश दिले आहेत.

## भाकपचे बीड जिल्हा अधिवेशन उत्साहात

**बीड :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे बीड जिल्हा त्रैवार्षिक अधिवेशन दि. १२ जून रोजी बीड शहरात सुमारे १३७ प्रतिनिधी आणि भा क.प.चे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे, राज्य सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड नामदेव चव्हाण आदींच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी सर्वानुमते जिल्हा सचिव म्हणून कॉ. भाऊराव प्रभाळे यांची फेरनिवड पुढील तीन वर्षासाठी करण्यात आली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष बीड अधिवेशन हॉटेल नीलकमल येथे संपन्न झालेल्या अधिवेशनात राज्यसचिव कॉ. सुभाष लांडे यांचे उद्घाटनपर भाषण झाले यावेळी बोलताना कॉ. लांडे यांनी ग्रामीण, कष्टकरी, शेतकरी, मजूर वर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारच्या विरोधातील संघर्ष घट्ट करण्याचे आवाहन केले. यावेळी अनेक मान्यवरांनी पक्षाच्या राजकीय, संघटनात्मक आणि भविष्यातील चर्चा करण्यात आली. अहवालामध्ये असलेल्या त्रुटी व दुरुस्ती सुचवल्या यावेळी अनेक राजकीय ठराव भविष्यकालीन कार्यक्रम ठरवण्यात आले. यावेळी ३५ सभासदांची नवीन जिल्हा कौन्सिल निवडण्यात आली. या अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातून अनेक प्रतिनिधी पक्ष सभासदांनी उपस्थिती लावली. यावेळी महादेव नागरगोजे, नवनाथ रांजवण, रंजना हुरकुडे, ज्योतिराम हुरकुडे, कॉ. उत्तमराव सानप, डी. जी. तांदळे, उस्मान पठाण, ॲड. भीमराव चव्हाण, पंकज चव्हाण, ॲड. अंबादास आगे, कॉ. करुणा टाकसाळ, फिडेल चव्हाण, योगेश वाघमारे, जानवी हुरकुडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## जिल्हयात सर्वदूर पावसाची हजेरी

**बीड :** जिल्ह्यातबुधवारी दुपारपासून पावसाने हजेरी लावली होती. दरम्यान गुरुवारी दिवसभर बीड जिल्ह्यात अधूनमधून मध्यम ते मोठ्या सरी बरसल्या. रात्री उशिरापर्यंत हा पाऊस सुरु राहिल्याने प्रकल्पातील पाणीसाठा वाढण्यास मदत झाली आहे. बुधवारी महावेध या शासनाच्या पोर्टलवर जिल्ह्यात सरासरी १४.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर गुरुवारी दिवसभरात १०.६ मि.मी. पाऊस झाला.

जिल्ह्यात विविध भागात पाऊस पडल्याने पेरण्या लांबणीवर पडतील असे बोलले जात आहे. दरम्यान या पावसामुळे अनेक ठिकाणी सखल भागात पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालकांचे हाल झाले तर आष्टी तालुक्यात काही गावात वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने नुकसान झाले आहे. यापूर्वी मे महिन्यात जोरदार अवकाळी पावसाने चार हजाराहून अधिक हेक्टरवरील पिके, फळबागा आणि बागायती क्षेत्राचे नुकसान झाले आहे तर वीज अंगावर कोसळल्याने पशुधन दगावले असून काही ठिकाणी घरांची पडझड झाल्याच्याही घटना घडलेल्या आहेत. आठवडाभरात पावसाने उघडीप दिली होती. त्यामुळे वाफसा होण्यास आता वेळ लागणार आहे.

## मेजर कुलकर्णी यांची निवड

**अंबाजोगाई :** शासनाचा वनश्री पुरस्कार प्राप्त मेजर एस पी कुलकर्णी यांची पर्यावरण मंत्रालय महाराष्ट्र शासन व नगरपरिषद अंबाजोगाई यांच्या वतीने पर्यावरण दूत म्हणून निवड झाली आहे. सदर निवडीचे पत्र आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते त्यांना देण्यात आले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी झटणारे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविणारे पर्यावरण प्रेमी म्हणून त्यांची खास ओळख आहे. मेजर एस.पी. कुलकर्णी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून वृक्षारोपण जलसंधारण प्रदूषण नियंत्रणासाठी जनजागृती आणि शाश्वत जीवनशैलीचा प्रचार यांसारख्या विविध कामांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे त्यांची दूरदृष्टी अथक प्रयत्न यामुळे अनेक गावांमध्ये आणि शहरी भागात पर्यावरणाप्रती लोकांमध्ये जागृती निर्माण केली आहे त्यांनी आजपर्यंत हजारोंवर वृक्ष लागवड केली असून त्याच्या संवर्धनासाठी ते प्रयत्न करत असतात.

# संपादक शेख मुजीब यांना पत्रकारितेचा मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा पहिला पुरस्कार रविवारी मान्यवरांच्या हस्ते होणार वितरण

**बीड (प्रतिनिधी):-** पत्रकारितेच्या माध्यमातून गेली १२ वर्ष म्हणजेच तब्बल एक तप सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर बेधडक लेखनी चालवणार्या आणि वंचित, उपेक्षित घटकांना सातत्याने न्याय देण्याची भुमिका ठेवणार्या सायं.दै.बीड सिटीझनच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सायं.दै.सिटीझनचे संपादक शेख मुजीब शेख खाजा यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पत्रकारितेतील पहिला दर्पणकार मराठवाडा भुषण २०२५ पुरस्कार जाहीर झाला आहे. रविवार दि.१५ जुन रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार्या सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी दिली आहे.

### संपादक शेख मुजीब यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव..

**सायं दैनिक सिटीजनचे संपादक शेख मुजीब यांनी एक टपरी चालक ते दैनिकाचा संपादक असा यशस्वी प्रवास केल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचा पत्रकारितेमधून दर्पणकार मराठवाडा भूषण २०२५ जाहीर करण्यात आला. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या संपादकाची निवड पत्रकार संघाच्या राज्यकारणीने मान्य केल्याबद्दल पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने शाल, श्रीफळ, पेढा भरवून अभिनंदन करण्यात आले. यावेळी पत्रकार संघाचे राज्याचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांच्यासह ग्रामीणचे बीड जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, बीड ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे, बीड जिल्हा सचिव शेख वसीम, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सचिव शेख अब्दुल, जिल्हा संघटक रईस खान, उपाध्यक्ष शेख आयुब, महिला सचिव अनुप्रिता मोरे, ज्येष्ठ मुक्त पत्रकार युसुफ भाई, ज्येष्ठ समाजसेवक रमेश गंगाधरे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. या निवडीबद्दल जिल्ह्यातील पत्रकारांसह विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.**



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई मराठवाडा विभागाच्या वतीने पत्रकार संघाचे मराठवाडास्तरीय रौप्य महोत्सवी अधिवेशन आणि मराठवाडा भुषण पुरस्कार सोहळा २०२५ चे आयोजन रविवार दि.१५ जुन रोजी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदीर उस्मानपुरा येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प.पु.१००८ महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, जालन्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे, हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, परभणीच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर, राज्यसभेचे खा.डॉ.भागवत कराड, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, आ.प्रदिप जैस्वाल, आ.प्रशांत बंब, आ.संजय केनेकर, आ.संजनाताई जाधव, आ.अनुराधाताई चव्हाण, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडलाचे अध्यक्ष जयदिप कवाडे, जेष्ठ पत्रकार मधुकरआण्णा वैद्य, माजी महापौर नंदकुमार घोडेले, डिजीटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे तर विशेष अतिथी म्हणून एबीपी माझ्याच्या संपादीका सरिताताई कौशिक, प्रसिध्दी अभिनेते योगेश सिरसाट, बंगरूळूच्या पुर्णब्रम्ह प्रशासकीय संचालिका जयंतीताई कठाळे यांची उपस्थिती राहणार आहे. पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटनीस डॉ.विश्वास आरोटे, प्रदेशउपाध्यक्ष अशोक देडे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, राज्यसमन्वयक नितीन शिंदे, प्रदेश प्रसिध्दीप्रमुख नवनाथ जाधव, कार्याध्यक्ष निलेश सोमानी आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळी १० वाजता भारतीय माध्यमांचा डीएनए कोणता ? माध्यमांचे भूत, वर्तमान आणि भविष्य या विषयावर परिसंवाद आयोजीत करण्यात आला आहे. यामध्ये संवादिका अश्विनीताई डोके यांच्यासह एबीपी माझ्याच्या संपादिका सरिताताई कौशिक, माजी कुलगुरू सुधीर गव्हाणे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, संजय सोनवणी, ॲड.महेश भोसले, अविनाश वानखेडे आणि ॲनालायझरचे संपादक सुधीर कुलकर्णी हे वक्ते सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हाध्यक्ष डॉ.छबुराव ताटे यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथील सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.


# बीड शहरातील रस्त्याची जीओ कंपनीकडून तोडफोड-प्रकाश वडमारे

## जीओ कंपनी एखाद्याचा जीव गेल्यावर खड्डे बुजविणार का ?

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील मोंढा नाका ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते मोमीन पुरा मार्गे बार्शी नाका ते तेलगाव नाका, शासकीय दुध डेअरी ते सोमेश्वर मंदिरापासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगर नाका या परिसरातील सिमेंट रस्त्याची तोडफोड करुन व पाईपलाईनची नासधुस करीत जीओ कंपनीकडून बीड नगर परिषद व राष्ट्रीय महामार्ग उपविभाग सा.बां.विभाग बीड यांच्याशी संगनमत करुन डिजीटल फायबर (ओएफसी) केबल टाकण्याचे काम जीओ कंपनीच्या गुत्तेदाराकडून नियम पायदळी तुडवून करण्यात येत आहे. जीओ कंपनीकडून केबल टाकण्याच्या नावाखाली गेल्या अनेक दिवसापासून सिमेंट रोडवर सहा फुटाचे खड्डे खोदून ठेवले आहेत. खोदलेले खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वडमारे यांनी केली आहे.



बीड शहरातील सर्व परिसरातील सिमेंट रस्ते खोदून ठेवल्यामुळे नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. जीओ कंपनीने केबल टाकण्यासाठी न.प.बीड व राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड यांच्याकडून परवानगी घेतली आहे का? घेतली असेल तर खड्डयाच्या बाजुला खड्डा खोदण्याचे फलक किंवा काम सुरु असल्याचे फलक लावण्यात आले नसल्यामुळे अपघात होवून जीवीत हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जीओ कंपनीकडून खड्डे खोदून ठेवल्यामुळे पावसाचे पाणी खड्डयात साचल्यामुळे अनेक वाहने खड्डयात पडून सर्व सामान्य नागरीक जखमी होतांना दिसून येत आहेत. बीड शहरातील खड्डे जीओ कंपनी एखाद्या नागरीकाचा जीव गेल्यावर बुजविणार आहे का? जीओ कंपनीने खोदलेला रस्ता तात्काळ दुरुस्त करुन घ्यावा नसता दुरसंचार विभाग भारत सरकार तसेच जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे तक्रार करण्यात येईल अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वडमारे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



## सतीश शिंदे यांची राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यपदी निवड

**प्रतिनिधी (पाटोदा):** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीच्या बीड युवक जिल्हा अध्यक्षपदी पैलवान सतीश शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे पैलवान सतीश शिंदे यांच्या खांद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीकडून युवक बीड जिल्हा अध्यक्षपदाची जबाबदारी दिल्याने बीड जिल्ह्यातील

युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाला जिल्हाध्यक्ष बरोबर युवक जिल्हाध्यक्ष देखील खामक्या मिळाला असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. सतीश शिंदे यांच्या रूपान पक्षातील राहिलेली मरगळ सुद्धा झटकली जाईल आणि पक्षातील कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जा मिळू शकते. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सुद्धा सतीश शिंदे यांचा मोठा फायदा होऊ शकतो असा विश्वास देखील व्यक्त होऊ लागला आहे.

# परमेश्वरावर विश्वास ठेवा, अविश्वास नको : प्रदीपजी मिश्रा

**चाकरवाडी (प्रतिनिधी):** शिव परमेश्वरावर विश्वास ठेवा परमेश्वरावर ठेवलेला विश्वास तुमच्यात आत्मविश्वास निर्माण करेल, त्या आत्मविश्वासाच्या जोरावर तुमच्या आयुष्यात कार्य सिद्धी होईल, परंतु फक्त अंधविश्वास ठेऊ नका. अंधविश्वास तुमच्या आयुष्याच नुकसान करतो. त्यामुळे प्रत्यकाने शिव परमेश्वरावर विश्वास ठेवावा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले. दरम्यान आज शनिवार रोजी चाकरवाडी येथे सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेचा सांगता समारंभ होणार आहे.



चाकरवाडी येथे २० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या आशीर्वादाने व महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेत प्रदीप मिश्रा बोलत होते बोलत. यावेळी पुढे बोलताना मिश्राजी म्हणाले की, शिव, विष्णू, नारायण, पांडुरंग, कृष्ण, कन्हैया, माऊली दादा महाराज कोणताही नामस्मरण करा सर्व एकच आहे. कोणाची प्रगती पाहिल्यावर आपण त्याच्या पेक्षा मोठी झेप घ्यावी परंतु कोणाविषयी जळाऊ वृत्ती ठेऊ नये, कोणी एखादी गाडी घेतली तर आपण मोठी गाडी घ्यावी, परंतु त्याच्या गाडीवर कोणीही जळू नये हि जळाऊ वृत्ती संपवणे गरजेचे आहे. त्यामुळे अध्यात्म गरजेचे असून शिवभक्ती करणे काळाची गरज आहे शिवभक्ती केल्याने मानवी आयुष्यात आनंद निर्माण होईल व देवावरील भक्ती मुळे वृत्ती माणसातून कमी होईल त्यामुळे श्रद्धापूर्वक शिवभक्ती करा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले.

## साक्षाळपिंप्री ते नारायणगड जूना रस्ता झाला खुला

**बीड(प्रतिनिधी:** तालुक्यातील साक्षाळपिंपरी ते नारायणगड हा सुमारे ७० ते ७५ वर्षांपूर्वीचा जुना रस्ता गेली चार वर्ष पासून बंद होता. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पाचशे मीटर रस्ता अडवलेल्या शेतकऱ्यांना समक्ष जागेवर बोलावून गावकऱ्यासमोर समजावून सांगितले. त्यानंतर तहसीलदार शेळके यांनी सामोपचाराने ग्रामपंचायतचे कर्मचारी यांच्या मदतीने रस्त्याच्या खुणा करून मार्किंग करून देत हा रस्ता खुला करून देण्यात आला. यापूर्वी हा रस्ता खुला करण्यासाठी मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ शेळके, ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप यांनी प्रयत्न केला. परंतु त्यांना त्यामध्ये यश आले नाही. त्यामुळे बीडचे तहसीलदार चंद्रकांत

शेळके यांनी गुरुवारी या ठिकाणास भेट दिली. त्यांच्या पुढाकाराने साक्षाळपिंप्री ते नारायणगड हा सुमारे तीन किलोमीटर लांबीचा रस्ता खुला झाला. हा रस्ता गट नंबर ५७२ मध्ये अडवलेला होता. अंदाजे पाचशे मीटर रस्ता हा अत्यंत अरुंद होता. या ठिकाणी खोल पाणंद असल्यामुळे चिखल होत होता. त्यामुळे शेतकऱ्यांना रस्त्याचा वापरच करता येत नव्हता. शेतकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना भेटून सदर रस्त्याची हकीकत सांगितली होती. दरम्यान तहसीलदारांच्या भेटीत दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांनी सुद्धा प्रशासनाला सहकार्य करत आम्ही तात्काळ जेसीबीच्या साह्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाल्या करून जास्तीत जास्त रस्ता उंच करू, जेणे करून येथे पुन्हा चिखल होऊ देणार नाही अशी हमी दिली. हा रस्ता खुला केल्याबद्दल गावचे सरपंच सौरभ नलावडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे गावच्यावतीने आभार मानले. रस्ता खुल्या केल्यामुळे या रस्त्याने सुमारे ५०० शेतकऱ्यांची ये जा करण्याचा मार्ग खुला झाला आहे. रस्ता खुला करतेवेळी गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# ठाण मांडून बसलेल्या तलाठी, मंडल अधिकाऱ्यांच्या बदल्या करा : ॲड गोले

**माजलगाव (प्रतिनिधी)** तालुक्यात काही तलाठी, मंडळाधिकारी हे अनेक दिवसांपासून माजलगाव तालुक्यात ठाण मांडून बसले असुन खाजगी कार्यालय व खाजगी व्यक्तीमार्फत हजारो रुपयांचा व्यवहार करून शेतकऱ्यांना वेठीस धरत असल्याने अशा तलाठ्याच्या त्वरीत बदली करण्याची मागणी शेकापचे ॲड. नारायण गोले पाटील यांनी केली आहे. अनेक वर्षापासून तालुक्यात ठाण मांडून बसलेल्या तलाठ्यांना तालुक्यातील इतंबूत माहिती झाली असून ते सज्जावर जात नाहीत अथवा

शेतकऱ्यांचे फोन देखील घेत नाहीत तसेच माजलगाव शहरात खाजगी कार्यालये थाटुन खाजगी व्यक्तीच्या ताब्यात शासकीय दस्तऐवज देऊन आपल्या कर्तव्यात कसूर करुन खाजगी व्यक्तीच्या माध्यमातून प्रचंड माया जमवत आहेत या बाबत वरिष्ठांकडे शेतकरी कामगार पक्षाने अनेक तक्रारी करून देखील केवळ वरिष्ठाची मर्जी सांभाळत असल्याने त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही केली जात नाही, याशिवाय काही तलाठी मंडळ अधिकारी तर तहसीलदार व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाळू, मुरूम यासह विविध कामात पैसे गोळा करून देतात, त्यामुळे वरिष्ठ त्यांची बदली करायला धजत नाहीत उलट पक्षी त्यांची बदली होऊ नये यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात, तसेच शेतकऱ्यांना शुल्लक शुल्लक कामासाठी अनेक खाजगी कार्यालयाचे उंबरठे झिजवायला भाग पाडतात त्यामुळे शेतकरी देखील तलाठी मंडळ अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळले आहेत म्हणून गेल्या अनेक वर्षापासून माजलगाव येथे कार्यरत असलेले मंडळ अधिकारी तलाठी यांच्या बदल्या करणे कामी माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी, गौरव इंगोले यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाचे वतीने निवेदनाद्वारे मागणी केली असून बदल्या न केल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशाराही शेतकरी कामगार पक्षाचे वतीने दिला असून निवेदनावर शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील, भाई श्रीराम शेवाळे, भाई श्रीराम कोरडे, भाई मुंजा पांचाळ, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई भास्कर कांबळे, भाई चांगदेव शेजुळ, भाई साळुजी हांडे, भाई कडाजी नावडकर आदिंच्या

# विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केली पाणीपुरवठा योजनेची पाहणी

# पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित कामे कालमर्यादेत पूर्ण करा-विभागीय आयुक्त पापळकर

छत्रपती संभाजीनगर (सरकार): विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज जायकवाडी धरणातील उद्धव विहीर (जॅकवेल) पासून ते नक्षत्रवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्र येथे सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा योजनेतील जॅकवेल, प्रोच ब्रिज, फिल्टर प्लँट आदीसह सुरू असलेल्या कामाची पाहणी करून प्रत्येक कामाला काम पूर्ण करण्याबाबत विहित कालावधी निश्चित करण्यात आला आहे. विहित कालावधीत कामे पूर्ण करा,असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज संबंधित यंत्रणेला दिले.

पाहणी दौऱ्यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता श्रीमती मनीषा पलांडे, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त देविदास टेकाळे, मजीप्रचे कार्यकारी अभियंता किरण पाटील, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री.देशमुख यांच्यासह सबंधित यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते.विभागीय आयुक्त श्री पापळकर म्हणाले, छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे. पाणीपुरवठ्यासाठी जॅकवेलचे काम वेळेत संपवून पाणी उपसा सुरू करणे, २६ एमएलडीचा टप्पा जूनअखेर पूर्ण करणे, यासह कंत्राटदारांनीही कामे वेळेत पूर्ण





करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाचे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कंत्राटदार कंपनी आणि महापालिकेच्या सबंधित यंत्रणेने आपसात समन्वय ठेवत विहित कालमर्यादेत काम पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. महापालिका व कंपनीतर्फे करण्यात येणारी उपाययोजना याबाबत त्यांनी माहिती घेतली. विहित कालमर्यादेत काम पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ वाढविणे, २४ ठिकाणच्या जोडण्या पूर्ण करणे, ३० टाक्याचे बांधकाम आणि वितरण व्यवस्था जोडणीचे काम मागे पडले आहे ते काम कंत्राटदाराने पूर्ण करण्याबाबत विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी सूचना दिल्या.

जायकवाडी धरणक्षेत्रातील जॅकवेल, चितेगाव येथे सुरू असलेले मुख्य जलवाहिनीचे काम, फारोळा येथील २६ दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, नक्षत्रवाडी येथील ३९२ दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, नक्षत्रवाडी येथील मुख्य संतुलन जलकुंभ या सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी पाहणी करून अडचणीही जाणून घेतल्या. मा.उच्च न्यायालयात पाणी पुरवठा योजनेबाबत जनहित याचिका सुरू असून प्रशासनाकडून मा.उच्च न्यायालयाला वेळेवेळी पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा दिला जातो. ११ जून रोजी याबाबतचा आढावा देण्यात आला. मुख्यमंत्री महोदय यांनीही मुंबई येथे नुकतीच पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा बैठक घेतली असून या बैठकीत छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करा असे निर्देश देण्यात आले आहेत.

# आ.धनंजय मुंडेंच्या राष्ट्रवादी भवन भेटीस तुफान गर्दी

## पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची कामे मार्गी लावण्यात धनंजय मुंडे ४ तास रमले

बीड (सरकार): राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री आ धनंजय मुंडे आता पुन्हा एकदा कामकाजात कमालीचे सक्रिय झाले असून आज त्यांनी बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे जनता संवाद उपक्रमास उपस्थित राहून पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व कामे समजून घेतली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस भवनचा संपूर्ण परिसर कार्यकर्ते व नागरिकांनी तुडुंब भरून गेला होता.

पक्षातील विविध पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर आलेल्या नागरिकांची कामे मार्गी लावण्यामध्ये धनंजय मुंडे हे तब्बल चार तास रमले होते.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे



जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण, माजी आमदार संजय भाऊ दौंड, ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, समता परिषदेचे ॲड. सुभाष राऊत, डॉ योगेश क्षीरसागर, बबन गवते, अमर नाईकवाडे, फारुख पटेल, मोईन मास्टर, अविनाश नाईकवाडे यांसह विविध आघाडी, फ्रंटल सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# पाच महिन्याचे थकीत मानधन तत्काळ द्या

## आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तकांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे

बीड (सरकार) जानेवारी २०२५ पासून पाच महिन्यांचे मानधन थकीत असल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांनी अखेर रस्त्यावर उतरून आपल्या मागण्यांसाठी लढा पुकारला आहे. महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महासंघाच्या वतीने १३ जून २०२५ रोजी बीड जिल्हा परिषदेसमोर दुपारी १२.३० वाजता धरणे आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू होते.

या आंदोलनाच्या निमित्ताने शासनाच्या दिरंगाईविरोधात संतप्त भावना व्यक्त करताना संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख,प्रदेश कार्याध्यक्ष कमल बांगर, राज्य संघटक दत्ता देशमुख, आणि जिल्हाध्यक्ष सचिन आंधळे यांनी सांगितले की, गेल्या पाच महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे अनेक आशा व गटप्रवर्तकांना



उपासमारीची वेळ आली आहे. काही महिलांना घर चालवण्यासाठी कर्ज काढावे लागत आहे, तर काहींना दौऱ्याच्या खर्चासाठी उसनवारी करावी लागत आहे.

राज्य शासनाकडून एप्रिल २०२५ चे मानधनाचा निधी जिल्हा प्रशासनास प्राप्त झालेला असूनही तो अद्याप वितरीत झालेला नाही, ही बाब विशेष चिंतेची असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. बायोमॅट्रिक हजेरीची सक्ती, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील थकीत मोबदला, तसेच ऑनलाईन कामांसाठी आवश्यक मोबाईल, सिम कार्ड व रिचार्जसाठी शासनाकडून कोणतीही सुविधा दिली जात नसल्याच्या तक्रारीही यावेळी मांडण्यात आल्या.

गटप्रवर्तकांकडून कोणते नोंदी व कागदपत्रे मागवायचे याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना न दिल्याने गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या कामाच्या स्वरूपात सुसूत्रता आणण्यासाठी आशा डायरीप्रमाणे रेकॉर्ड डायरी देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच वेतन चिठ्ठी नियमितपणे देण्यात यावी आणि दर तीन वर्षांनी गटप्रवर्तकांकडील रेकॉर्ड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात जमा करण्याची प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही यावेळी मांडण्यात आली. या मागण्यांबाबत जिल्हा प्रशासनाने त्वरित शिष्टमंडळाशी चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. जिल्हा अतिरिक्त आरोग्य अधिकारी आठवले, जिल्हा समन्वयक श्री बादाडे साहेब यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

# जेएनयू विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीवर खा. रजनीताई पाटील यांची निवड

केज (सरकार): दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीच्या सदस्यपदी काँग्रेसच्या राज्यसभा खा रजनीताई अशोकराव पाटील यांची निवड झाली. राज्यसभेच्या अध्यक्षांनी सदस्यत्वाचे मानांकीत केले आहे.

जगातील काही प्रमुख विद्यापीठांपैकी महत्वाच्या आणि वैचारीक म्हणून ओळख असलेल्या जेएनयू विद्यापीठाच्या न्यायालयीन सदस्यपदावर खा रजनीताई पाटील,डॉ.सुधांशू त्रिवेदी, डॉ.सस्मित पात्रा ,डॉ. अशोक कुमार मित्तल आदींची निवड करण्यात आली आहे. समिती समन्वय विभागाचे महासचिव पी सी मोडी यांनी याबद्दल अभिनंदन केले आहे. जे एन यु विद्यापीठात माझे शिक्षण झाले त्याच विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीवर काम करण्यास विशेष आनंद आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी काम करत राहणार असल्याचे खा पाटील यांनी सांगितले.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राला आली अवकळा छत गळती

बीड (सरकार): तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे मुख्य बाजारपेठ असलेल्या पंचक्रोशीतील १५ वाड्यांतील गोरगरीबांना आरोग्य सेवा पुरवणाऱ्या ३७ वर्षे पूर्ण झालेल्या लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अवकळा आली असुन पावसाळ्यात मुख्य इमारतीतील छत खराब झाल्याने गळती लागली असुन रूग्णांची तारांबळ उडत आहे.

शस्त्रक्रिया गृहातील लाईट फिटींग नादुरुस्त आणि जीर्ण झालेली असुन नव्याने करण्याची आवश्यकता आहे. तसेच मुख्य इमारतीतील टायलेट ब्लॉकेज असुन रूग्णांची गैरसोय होत आहे.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचा विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत होत असुन सिंगल फेजची जोडणी करण्यात यावी यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासस्थानांची दुरावस्था झाली असून त्यांची दुरूस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी तसेच परिचर ५ मंजूर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन



उर्वरित ३ रिक्त पदे भरण्यात यावीत.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना बांधण्यात आलेल्या निवासस्थानांची दुरावस्था झाली असुन पावसाळ्यात पाणी गळती होते. दरवाजे खिडक्या मोडकळीस आलेल्या आहेत.लाईट फिटींग ठिकठिकाणी उखडलेल्या अवस्थेत असुन नादुरुस्त आहे.टायलेट आउटलेट ब्लॉकेज असल्याने अधिकारी आणि कर्मचारी यांची गैरसोय होते. फरश्या तुटलेल्या अवस्थेत आहेत.आणि निवासस्थानांची रंगरंगोटी करण्याची आवश्यकता आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील ५ मंजुर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन ३ परिचर पदे रिक्त असुन त्यामुळे मनुष्यबळावर मानसिक व शारीरिक ताण येत असुन रिक्त पदांची नियुक्ती करण्यात यावी. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# परळीकडून लातूरमार्गे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा द्या-फड

परळी (सरकार) बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ हे देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असे पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग आहे. दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर परळी वैजनाथ रेल्वे स्थानक हे जिल्ह्यातील सर्वात जुने आणि एकमेव स्थानक असून येथील प्रवासी संघटनांच्या काही प्रमुख मागण्या आहेत. त्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून मार्गी लावाव्यात यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री तसेच दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांना पत्र लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी अनेक मागण्या केल्या आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्याकडे अनेक रेल्वे प्रवाशांनी विविध समस्या मांडल्या होत्या. त्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसेच सिकंदराबाद विभागाचे व्यवस्थापक यांना पत्र लिहून प्रवासी संघटनेच्या मागण्या पोचवल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने म्हटले आहे की, परळी वैजनाथ येथून लातूररोड रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना मतदारसंघातील घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा. जेणेकरून परळी, अंबाजोगाई तसेच लातूर जिल्ह्यातील अहमदपूर आणि रेणापूर तालुक्यातील प्रवाशांची सोय होणार आहे. याचबरोबर कोरोना महामारीच्या काळात काही रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या, त्यापैकी अमरावती - पुणे तसेच काकीनाडा - साईनगर (शिर्डी) या गाड्या नियोजित वेळापत्रकानुसार नियमित सुरू ठेवण्यात याव्यात. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता काही गाड्यांच्या डब्यांच्या संख्येत गरजेनुसार वाढ करण्यात यावी, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय होणार नाही अशा आशयाचे पत्र राजेभाऊ फड यांनी प्रवासी संघटनांच्या आग्रहास्तव केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पाठवले आहे.

# तेलगाव-किल्ले धारूर रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत एकजण जागीच ठार

किल्ले धारूर (सरकार): भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका व्यक्तीस जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकजण जागीच ठार झाल्याची दुर्घटना शुक्रवारी सायंकाळच्या वेळी घडली.दरम्यान घटनेची माहिती समजताच दिंद्रुड पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

यासंदर्भात समजलेली माहिती अशी की,केज येथील शेख आसरफ बाबा मियॉ हे शुक्रवार दि.१३ जुन रोजी सायंकाळी सहा ते साडे सहा वाजे दरम्यान भोगलवाडी फाटा येथील बस स्टॉपवर थांबले होते.यावेळी किल्ले धारूरकडुन भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने शेख आसरफ बाबा मियॉ यांना जोराची धडक दिली.यात शेख आसरफ हे धडक बसताच जागीच ठार झाले.धडक दिलेले वाहन कांही क्षणातच घटनास्थळारून पसार झाले.

# जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागच्या वतीने मेट्रन रमा गिरी सन्मानित

बीड (सरकार): बीड जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य आधिसेविका मेट्रन रमा गिरी यांना नुकताच महाराष्ट्र राज्याकडून दिला जाणारा मानाचा राज्यस्तरीय फ्लॉरेंस नाईटिंगेल पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री आंबेटकर व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्या हस्ते कोल्हापूर येथे देण्यात आला. हा पुरस्कार आरोग्य विभागातील सर्वोत्कृष्ट मानला जात आहे.

गेल्या ३० वर्षापासून रुग्णसेवेत काम करणाऱ्या अनेक रुग्णांच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीला धावून जाणाऱ्या आणि आरोग्य सेवेचा वसा आणि वारसा समर्थपणे सेवा देणाऱ्या जिल्हा रुग्णालयाच्या मेट्रन सौ. रमा गिरी यांचा जिल्हा प्रशासनाच्या वतीने व जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने भव्य दिव्य सत्कार सोहळा जिल्हा रुग्णालय परिसरात पार पडला. यावेळी जिल्हा प्रशासनातील उपजिल्हाधिकारी स्वामी साहेब, सी एस डॉक्टर संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, आर एमओ डॉ. संतोष शहाणे, डॉ. सुधीर राऊत, ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे, दत्ता बारगजे, प्राचार्य डॉ. सुवर्णा बेद्रे, डॉ चव्हाण यांची उपस्थिती होती. सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्र आरोग्य विभाग अंतर्गत व बीड जिल्हा रुग्णालयात गेल्या ३० वर्षापासून विविध पदावर काम करत असलेल्या मेट्रन सी. रमा गिरी यांना उत्कृष्ट रुग्ण सेवा २०२५ चा सर्व उत्कृष्ट मानला जाणारा आरोग्य विभागाचा पुरस्कार कोल्हापुर येथे राज्याचे आरोग्य मंत्री आंबेटकर यांच्या हस्ते देण्यात आला. बीड जिल्हा आरोग्य विभागाला हा पुरस्कार मिळाल्याने आज जिल्हा रुग्णालय व जिल्हा प्रशासनाच्या वतीने भव्य दिव्य सत्कार सोहळा आयोजित केला होता. या सत्कार सोहळ्या ला जिल्हा प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी स्वामी यांची उपस्थिती होती.



हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)